**जळालेला मोहोर**

पंधरा मार्च हा आमच्या शैक्षणिक वर्षातला अखेरचा दिवस असतो. नेमलेला अभ्यास शिकवून संपलेला असतो म्हणून त्या दिवशी काम असे काही विशेष असत नाही. हजेरी पुस्तकात सही केल्यावर ‘स्टाफ रूम’मध्ये थोड्यावेळ गप्पा करून आम्ही प्राध्यापक मंडळी एकमेकांचा निरोप घेतो. त्या दिवशी असा निरोप घेऊन मी कॉलेजातल्या एका पायवाटेने जवळच असलेल्या माझ्या घराकडे निघाले होते. सकाळी अकरा साडेअकराची वेळ. डोक्यावर ऊन चांगले तापू लागले होते. म्हणून मी झपाझप पावले टाकीत होते. एवढ्यात कानावर शब्द आले, "गुड मॉर्निंग मॅडम." मी मान वर करून पाहिले. गहू वर्णाचा, मध्यम उंचीचा, काहीसे रुंद कपाळ असलेला एक विद्यार्थी एका हातातील वह्या-पुस्तके सावरीत आणि दुसऱ्या हातातील पेटत्या हातातील सिगारेटचे थोटुक लपवीत, मला अभिवादन करीत होता. रोज माझ्या हाताखाली शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी तो नसल्याने मला त्याचा चेहरा ओळखीचा वाटेना. म्हणून क्षणभर मी त्याच्याकडे जरा निरखून पाहिले. त्याचा पोषाख बऱ्यापैकी होता. पण माझे लक्ष वेधले गेले ते त्याच्या हसण्याने. शून्यात दृष्टी लावून तो जणू आपल्याशीच हसत होता. माझ्याकडून बहुधा त्याने प्रत्युत्तराची अपेक्षा केली असावी. पण ते मिळाले नाही असे दिसताच त्याने माझ्याकडे मान वळवली आणि आपल्या हातापायांची वेडीवाकडी चाळवाचाळव केली. क्षणभर अज्ञातात कुठेतरी विमनस्कपणे नजर लावीत स्वतःशीच हसून तो अदबीने मला म्हणाला, "गुड मॉर्निंग मॅडम, गुड मॉर्निंग." या वेळी मात्र मी पटकन उत्तर दिले, "येस गुड मॉर्निंग फ्रेंड" मला वाटले आता तो काहीतरी बोलेल. पण तसे काहीच घडले नाही. त्याने एकदम ‘अबाउट टर्न’ केले आणि आपल्या चपला फरपटवीत तो विरुद्ध दिशेने चालू लागला. तो दिसेनासा होईपर्यंत मी त्याच्याकडे पाहत उभी होते. जरा वेळ तिथे थांबून मी पुन्हा चालायला लागले. पण आता मात्र माझी पावले भराभरा उचलेनात. काही वेळाने मला एकदम आठवले, हाच तो ‘सुधीर’! कॉलेजात चर्चेचा विषय झालेला विद्यार्थी! माझ्या सहकारी बंधूंकडून आणि विद्यार्थी मित्रांकडून मी बरेच ऎकले होते ते आठवताच माझे मन सुधीरबद्दल अपार करुणेने भरून आले. मनात विचर आला, आलेल्याच रस्त्याने आपण मागे जावे, सुधीरला गाठावे, त्याच्या खांद्यावर आपुलकीने हात ठेवावा आणि आपुलकीने त्याला विचारावे, "कुठे चालला आहेस सुधीर या उन्हातून तू? आजपासून कॉलेजला सुट्टी झाली आहे, ते नाही का तुला ठाऊक? मग घरीच जा. नाहीतर स्नेही-मित्रांकडे जा किंवा समोरच्या आंब्याच्या झाडाखाली बसू या आपण थोड वेळ? तुझ्याशी खूप बोलावे असे वाटते मला!" पण तो माझा विचार मनातच विरघळला. कारण त्याची शून्यमनस्क अवस्था आणि कुठे तरी बघून स्वतःशीच वारंवार हसणे यांनी मीच कावरीबावरी झाले.

सुधीर हा मूळचाच एक बुद्धिमान विद्यार्थी. इंग्रजी, गणित आणि विज्ञान या विषयात तर त्याचा हातखंडाचा. एस. एस. सी. परीक्षेत खूपच वरच्या क्रमांकाने तो उत्तीर्ण झालेला. दोन-तीन वर्षापूर्वी तो एका चांगल्या शहरगावी महाविद्यलयीन शिक्षणासाठी वसतिगृहात राहिला होता. आपल्या चमकदार बुद्धीने आणि मनमोकळ्या गोड स्वभावाने अल्पावधीतच त्याने शिक्षकांची व विद्यार्थ्यांची मर्जी सांभाळली. पण संथपणे आणि व्यवस्थित रीतीने चाललेल्या त्याच्या जीवनाला एक दिवस अचानक विचित्र धक्का मिळाला आणि त्यामुळेच तो आणि त्याचे घरदार या साऱ्यांचीच मनःशांती समाप्त झाली. झाले काय? तर एक दिवस रात्री तो गाढ झोपी गेला असता काही उपद्व्यापी, टवाळ, खोडसाळ मुलांनी त्याला अंथरुणासकट जे उचलले ते नेऊन ठेवले एकदम वसतिगृहाच्या पिछाडीस असलेल्या स्मशानभूमीतच! रॅगिंग नावाचा जो अत्यंत अश्लाघ्य व भयानक प्रकार हल्ली दुर्दैवाने अनेक शिक्षणसंस्थातून चालतो त्याचीच ही एक आवृत्ती होती. त्याला गाढ झोप लागावी म्हणून त्याच्या चहापाण्यातून गुंगीचे औषधही त्याला त्य विद्यार्थ्यांनी पाजले होते की काय कोण जाणे! गुंगीचा अंमल उतरल्यावर सुधीर जागा झाला तर काय? अवतीभवती किर्रर्र अंधार आणि अंतराअंतरावर विझू लागलेल्या चितांचा भगवट प्रकाश यांच्यामध्ये बिछान्यासह आपण पडलो आहोत असे त्याच्या ध्यानात आले. भीतीने त्याचे अंग लटलटा कापू लागले, तोंडातून शब्द फुटेना, काय करावे ते त्याला सुचेना. अन् या साऱ्यांचा जबरदस्त मानसिक ताण पडून तो बेशुद्ध झाला. सकाळी कोणी कसा त्याला वसतिगृहात अणून पोहोचविला त्याची हकीकत मला ठाऊक नाही. संस्थेच्या अधिकाऱ्यांनी तात्पुरते उपचार करून त्याच्या घरी तार केली. ती मिळताच त्याचे आईबाप धावत आले. येऊन पाहतात तो काय? आपला एकुलता एक, लाडका, हुशार मुलगा भ्रांतचित्त झलेला. दोन वाक्ये तो सरळ बोले तर पुढे सारे भाषण असंबद्ध असे.

भान हरपलेला, वेडेवाकडे हातवारे करीत कुठे तरी हातवारे अधांतरी नजर लावून पाहात मध्येच हसणारा आपला मुलगा पाहताच त्यांची जी शोचनीय अवस्था झाली असेल ती कशी वर्णावी? त्याचे आईबाप अत्यंत सत्शील, पापभीरू माणसे! वडील बडे सरकारी अधिकारी! या मुलावर त्यांच्या साऱ्या आशा-आकांक्षा केंद्रित झालेल्या! त्याला बरे वाटावे म्हणून त्यांनी दोन-तीन वर्षात शक्य असतील ते सारे उपाय केले. त्यासाठी पाच-पंचवीस हजार रूपये खर्च केले. बिचाऱ्या आईने उपासतापास, देवदेवर्षी सारे केले, पण व्यर्थ! "हा आता नाही सुधारायचा" हे अनुभवी मानसशास्त्रज्ञ, धन्वंतऱ्यांचे निदान ऐकून ते दोघे पार खचले. मग आमच्या महाविद्यालयाच्या अधिकऱ्यांना त्यांनी कळवळून सांगितले, "पोर पुस्तकवेडा आहे, मूळचा बुद्धीने चांगला आहे. आपण त्याला वर्गात बसायला परवानगी द्याल का? तो इतरांना काहीही त्रास द्यायचा नाही. पाहावे या उपायाने तरी मार्गावर येतो का?" आणि मग तो यथाकाल आमच्या महाविद्यालयात येऊ लागला. बी. ए. च्या दुसऱ्या तिसऱ्या वर्षात कुठेतरी तो होता. इंग्रजी फाडफाड बोलत असे. सुरेख कविता करी, पण स्वारीच्या डोक्यतले चक्र कधी फिरेल याचा नेम नसे. ते फिरले की त्याचा मुक्काम कधी वर्गाच्या प्रवेशद्वारातच किंवा कधी महाविद्यालयाच्या घंटेखालच्या फरशीवर! कधी हा आम्हा प्राध्यापकांच्या खोलीत येऊन, "सर, सकाळपासून चहाच घेतला नाही हो, द्या की आठ आणे म्हणून अजिजीने मागून घेई, तर कधी प्राध्यापक वर्गात शिकवीत असता त्यांच्या मागे उभे राहून "मित्रहो, मला लॉटरी लागली होऽ" म्हणून एकदम काहीतरी विचित्र बोलायला लागे! त्यामुळे कुणाच्या कुचेष्टेचा तर कोणाच्या उपेक्षेचा तो विषय बने. मला त्याच्या या साऱ्या वागण्या-बोलण्याने फार दुःख होई. त्याची दया येई. एका सुसंस्कृत, संपन्न घरातला हुशार, भावनाशील मुलगा! ज्याच्या अंतर्मनात गुरुजनांबद्दल आदर आहे, त्यांना पाहताच हातातील सिगारेटचे थोटुक फेकून देण्याचे ज्याला भान आहे, चांगल्या शिष्टाचारांची ज्याला ओळख आहे त्याच्या जीवनाची काय ही परवड रॅगिंगच्या दुष्ट खेळाने केली तो जेव्हा जरा बऱ्या स्थितीत असे तेव्हा आपल्यामुळे आपल्या आईवडिलांना मोठीच चिंता लागली आहे हे त्याला जाणवत असावे. माझे सहकारी मित्र सांगत होते, तो आपल्या बहिणीला म्हणयचा, "ताई, आपले आईबाबा थकत चालले आता. त्यांची एक तुला काळजी आणि मीही एक कायमची काळजीच की तुम्हा सर्वांना!" असा जो मनाचा कोवळा, मायाळू. त्याचे हे उद्ध्वस्त दुर्दैवी जिणे पाहिले की माझ्या डोळ्यापुढे एक चित्र उभे राहते. एखादा डेरेदार हापूसचा आम्रवृक्ष असावा सुगंधी मोहोराने तो अगदी लगडून जावा त्याच्या मधुर सुगंधाने आसमंत दरवळून जावे, याला किती स्वादिष्ट आम्रफळं लागतील या विचाराने येणाऱ्याजाणाऱ्याने त्याच्याकडे कौतुकाने अपेक्षेने पाहत असावे, तोच एक दिवस त्या मोहोरदार वृक्षावर अकस्मात वीज पडून त्या सुगंधी आम्रवृक्षाचा जळून कोळसा व्हावा तशीच या सुधीरच्या जीवनाची अवस्था नाही काय? सुधीर हा माझ्या ऐकण्या-पाहण्यात आलेला एक जळून गेलेला आम्रवृक्षाचा मोहोर! कोण जाणे असे किती मोहोर रॅगिंगच्या या अमानुष आगीत जळून गेले असतील! सुधीर या कमनशिबी मुलाचे त्याच्या असहाय पालकांचे दुःख कधी संपणार? कसे संपणार?